पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २०**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १४/८/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ८६१**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे जुलै २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/३७६ दि.६/८/२०१८ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ८६२**

मा.आबा बागुल यांचे दि. २/८/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.१८ विषय क्र.७३४ दि.३१.७.२०१८ हा विषय खास सभेकडे वर्ग केला असून या विषयाचा खालीलप्रमाणे फेरविचार करण्यात यावा.

पुणे शहरातील समाविष्ट गावांतील रस्ते अरूंद असल्याने वाहतूकीची समस्या अत्यंत जटील झालेली आहे. यामुळे अनेकवेळा अपघात घडून शेकडो नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. यावर उपाय म्हणून पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये वाढविणेसाठी वेळोवळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दालनामध्ये व मा.मुख्य सभेत चर्चा झाली असून रस्ते रूंद करणेबाबत सकारात्मक भूमिका आहे. तसेच विद्यमान मा.मुख्यमंत्री महोदयांनी देखील याविषयी पत्रव्यवहार व चर्चा झाली असून त्यांनी देखील सकारात्मक भूमिका घेतली असून कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासनाकडून पुणे महानगरपालिकेस पत्रव्यवहार देखील केला आहे. आता पुणे शहराचा विकास आराखडा देखील मान्य झाला आहे. या समाविष्ट गावांमध्ये मोठया प्रमाणात बांधकामे होवून मोठया प्रमाणात लोकवस्ती तयार झाली आहे. या गावांमधील प्रमुख रस्ते अरूंद आहेत. सबब याप्रकरणी स्थायी समितीकडे पूर्वीच प्रमुख रस्त्यांची रूंदी करणेसाठी ठराव दिला असून या ठरावास पुणे महानगरपालिका प्रशासनाचा अभिप्राय देखील सकारात्मक आलेला आहे. भविष्यात होणारी जिवित हानी टाळण्यासाठी पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

सबब यापूर्वीच मा.स्थायी समितीमध्ये याप्रकरणी विषय दिला असून पुणे शहरातील समाविष्ट गावांतील प्रमुख रस्त्यांची रूंदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० (१)(ब) अन्वये वाढविणेबाबत मा.स्थायी समिती ठ.क्र.२७ दि.३.४.२०१२ चा फेरविचार करून प्रशासनाच्या अभिप्रायासह विषय मान्य करण्यात यावा.

**विषय क्र. ८६३**

मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ७/८/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर विविध कारणांमुळे काही नागरिकांकडून भरला जात नाही. वेळेमध्ये मिळकत कर न भरल्याने तो दंडासहित वसूल केला जातो. हा दंड प्रतिमहिना मिळकत कराच्या २ टक्के म्हणजेच प्रतिवर्ष २४ टक्के इतका असून तो जाचक आहे. सबब अनेक नागरिकांकडून मिळकत कराची अभय योजना करणे संदर्भात वारंवार मागणी होत आहे.

तरी पुणे महानगरपालिकेच्या मिळकत कराची अभय योजना राबविण्यात यावी.

**विषय क्र. ८६४**

मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. २१९, अ.क्र.५३, प्रभाग क्र. ५ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ५ अ मधील शाळेत वैज्ञानिक विषयक कार्यक्रमांकरिता वैज्ञानिक साहित्य खरेदी करणे<br>२) प्रभाग क्र. ५ अ मध्ये हॉर्टीक्लचर विषयक विविध विकास कामे करणे<br>३) प्रभाग क्र. ५ अ मध्ये ड्रेनेज लाईन साफसफाई करणे | ---<br>---<br>--- | १० लाख<br>१० लाख<br>५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ८६५**

मा.सौ.सोनाली लांडगे यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ठिकाणची समाजमंदिरे सुशोभिकरण व स्थापत्य विषयक कामे करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई२०ए१२६/एसए१५-१४३, प्रभाग क्र. ७ अ मध्ये पी.एम.सी.कॉलनी चाळ नं.१० येथे पावसाळी लाईन टाकून कॉंक्रीटीकरण करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ७ अ मध्ये विविध ठिकाणची समाजमंदिरे सुशोभिकरण व स्थापत्य विषयक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ८६६**

मा.किरण दगडे पाटील यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १० अ कोथरुड बावधन येथील मौर्य विहार सोसायटी परिसरातील रस्ते व सहस्त्रबुध्दे गिरणी ते ३० मी.डी.पी.रस्त्यास जोडणारा कलम २०५ अन्वयेचा रस्ता व कल्व्हर्ट विकसित करणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई२०ए१२६२/एसए१५-१७१४, प्रभाग क्र. १० अ मध्ये उजवी भुसारी कॉलनी येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १० अ कोथरुड बावधन येथील मौर्य विहार सोसायटी परिसरातील रस्ते व सहस्त्रबुध्दे गिरणी ते ३० मी.डी.पी.रस्त्यास जोडणारा कलम २०५ अन्वयेचा रस्ता व कल्व्हर्ट विकसित करणे | --- | ४० लाख |

**विषय क्र. ८६७**

मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ७ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते मिलिंग करुन डांबरीकरण करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, पान क्र.१९४, बजेट कोड सीई२०ए१२६२/एसए१५-१६४८, प्रभाग क्र. ७ ब मध्ये विविध ठिकाणी युटीडब्ल्युटी पध्दतीने रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ७ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते मिलिंग करुन डांबरीकरण करणे | --- | ३० लाख |

**विषय क्र. ८६८**

मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.३१क मध्ये विविध ठिकाणी मशिनच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफसफाई करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं.ई १४ अे १०५/एसजी २ - ५५९, प्रभाग क्र.३१क मधील विविध ठिकाणी नविन शौचालय बांधणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३१क मध्ये विविध ठिकाणी मशिनच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफसफाई करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ८६९**

मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.विशाल धनवडे यांचे दि. ८/८/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील कोरेगाव पार्क येथील भैरोबा पंपिग स्टेशन व कल्याणीनगर-कोरेगाव पार्क पूल परिसरात नाला व नदीपात्रात २५ ते ३० जाहिरात फलक बेकायदेशीरपणे उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे जाहिरात नियमावली २००३, वाहतूक पोलीस ना-हरकत दाखला यांचे नियमांचे तसेच मे.उच्च न्यायालय व मे.हरित लवाद न्यायाधिकरण यांनी वेळोवळी पारित केलेल्या आदेश/निर्देशांचे स्पष्टपणे उल्लघंन करत आहेत. सदरील बेकायदेशीर जाहिरातफलकांवर व्यावसायिक जाहिरातीद्वारे होर्डिंग माफिया परवाना व आकाशचिन्ह विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून संगनमताने लाखो रूपये कमवत आहे. सबब कायद्याचा अनादर करणा-या व मे.न्यायालयीन आदेश/निर्देश यांचा अवमान करणा-या जाहिरातफलकांवर तातडीने कारवाई करण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ८७०**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांच्या माहे १ एप्रिल २०१८ ते १५ जुलै २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-१/३७० दि.६/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ८७१**

उद्यान विभागाकडील दि. १६ जुलै २०१८ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीमधील सविंदा करार व अन्य तद्अनुषंगिक माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेली माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/३७२ दि.६/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ८७२**

उद्यान विभागाकडील दि. १ एप्रिल २०१८ ते १५ जुलै २०१८ या कालावधीमधील सविंदा करार व अन्य तद्अनुषंगिक माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेली माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/३७३ दि.६/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ८७३**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांच्या माहे १६ जुलै २०१८ ते ३१ जुलै २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-१/३७४ दि.६/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ८७४**

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे नियंत्रणाखालील असलेल्या खात्यांकडील उपलब्ध झालेली सविंदा करार व अन्य तद्अनुषंगिक माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडलेली माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिमआ(वि)/३७५ दि.६/८/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. ८७५**

मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय यांचेकडील दि. १/४/२०१८ ते दि. १५/७/२०१८ या मुदतीतील व आरोग्य कार्यालय यांचेकडील दि. १/७/२०१८ ते दि. ३१/७/२०१८ या मुदतीतील सविंदा करार व अन्य तद्अनुषंगिक माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडलेली माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/अतिमआ(ज)/३७८ दि.७/८/२०१८ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ८७६**

पुणे महानगरपालिकेच्या श्री.चंद्रकांत विष्णु वाघमारे–झाडुवाला, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, कोंढवा–येवलेवाडी (जुना सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय) यांच्या निलंबनास दि.२७/११/२०१५ रोजी १३ वी, दि.२७/५/२०१६ रोजी १४ वी, दि.२७/११/२०१६ रोजी १५ वी, दि.२७/५/२०१७ रोजी १६ वी व दि.२७/११/२०१७ रोजी १७ वी सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/३८० दि. ७/८/२०१८ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. ८७७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८७८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८७९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८८०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८८१**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८८२**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. ८८३**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील उप मुख्य लेखापरिक्षक या कायम रिकाम्या जागेवर बढतीने नेमणूकीबाबत मा.मारुती तुपे, मा.सुनिल कांबळे, मा.दिलिप वेडेपाटील, मा.सौ.कविता वैरागे, मा.सौ.रंजना टिळेकर, मा.राजाभाऊ बराटे, मा.उमेश गायकवाड यांचे दि.२४/४/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि.२४/४/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/साप्र/३७७ दि.७/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ८८४**

प्रभाग क्र. २९ ब मधील दत्तवाडी, बाल शिवाजी मित्र मंडळ समोरील पूल रुंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिंदे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३७,७३,४०५=०८ पेक्षा पुर्वगणनपत्रक दराने (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,७३,४०५=०८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीवरील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/३७१ दि.६/८/२०१८ चे पत्र.

**सर्वात जास्त रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ८८५**

पुणे पेठ पर्वती स.नं.७५/७६, समतानगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुलातील फक्त जलतरण तलाव ३ वर्षे कालावधी लिव्ह ॲण्ड लायसन्स पध्दतीने चालविणेस देणेसाठी निविदा मागविली असता मे.ओम सिमेंन्ट प्रॉडक्टस तर्फे प्रो.प्रा.हेमंत सोलंकी यांची एकच निविदा आली असल्याने त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रू.३६,५९९=९९( अक्षरी र.रू.छत्तीस हजार पाचशे नव्व्याण्णव पैसे नव्व्याण्णव फक्त) ही मनपा निर्धारित मासिक र.रू.३६,४५०/- (अक्षरी र.रू. छत्तीस हजार चारशे पन्नास फक्त)पेक्षा र.रू.१४९=९९ (अक्षरी र.रू.एकशे एकोणपन्नास पैसे नव्याण्णव फक्त) ने जास्त असल्याने त्यांचेकडून शासकीय नियमानुसार प्रतिमहा भाडे रकमेवर वस्तु आणि सेवा कर प्रचलित दराने भरून घेणेस त्यांची निविदा स्विकारून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्ती प्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेस,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२८६, दि.२३/७/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२९ दि.२७/७/२०१८ विचारासाठी.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ८८६**

मा.सौ.अश्विनी लांडगे यांचे दि. ३१/७/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.६क मधील ज्येष्ठ नागरिक, महिला,पुरुष व शालेय विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करणे व जनजागृती करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेटकोड क्र. CE17A242/SJ6-160 प्रभाग क्र.६क, मध्ये राजीव गांधी हॉस्पीटल मध्ये एक्सरे सुविधा मशीनरी, सोनोग्राफी मशीन व डायलसिस मशीन पुरविणे. | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र.६क , मधील ज्येष्ठ नागरिक, महिला,पुरूष व शालेय विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करणे व जनजागृती करणे. | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.७/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ८८७**

श्री.रमेश शंकरराव पांढरे व अशोक बबनराव पांढरे यांना पुणे पेठ शिवाजीनगर सि.स.नं. १२६३/१ फा.प्लॉट नं. ५९३/१ येथील ३० मी.डी.पी. रोडसाठी रस्तारुंदी बाधित ७५.२५ चौ.मी. क्षेत्राची रोख नुकसान भरपाई देणेसाठी सन २०१७ चे शीघ्रसिध्दगणकाप्रमाणे मुल्यांकन र.रुपये ५३,९३,९२०/- + दिलासा र.रुपये १६,१८,१७६/- असे एकुण मोबदला र.रुपये ७०,१२,०९६/- यांना भूसंपादन व व्यवस्थापन खात्याकडील FE11A102 चे अंदाजपत्रकीय अर्थशिर्षक व खर्ची टाकणेस व प्रॉपर्टी कार्डावर पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेनंतर संबंधिताना देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/३१८ दि.३०/७/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.७/८/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**